# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

**२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**

मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८

फोन २२७०४४००,२२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६

**E-mail - mail@mchmumbai.org** **Web site:www.mchmumbai.org**


## जाहिर निविदा

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद मुंबई या विधीमंडळ अधिनियमाप्रमाणे स्थापित स्वायत्त संस्थेला आपल्या मुंबईस्थित कार्यालयाकरिता बांधून वापरण्याकरिता तयार असलेली अंदाजे २,५०० ते ६,००० स्वे. फूट जागा मालकी हक्काने खरेदी करावयाची आहे. तरी इच्छूक जागा मालकांनी कार्यालयात रोख रक्कम रु. ५०००/- भरुन निविदा प्राप्त करुन योग्य रित्या भरलेली निविदा आवश्यक ती सर्व कागदपत्रे किंवा कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह परिषदेच्या कार्यालयात दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सीलबंद लखोटयात सादर कराव्यात. सदर निविदांबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार परिषद राखून ठेवत आहे.

परिषदेच्या अटी -

१) निविदा सादरकर्ता हा जागेचा अधिकृत मालक किंवा विक्री व्यवहाराचे कायदेशीर हक्क प्राप्त असलेला मुखत्यारपत्रधारक असावा.

२) जागा स्वमालकीची/विकसक म्हणून मुखत्यारपत्रक असल्याबाबत/विक्रीचे कायदेशीर मुख्यत्यारपत्र असल्याचे व संपूर्ण जागा बोजाविरहीत व निर्वेध असल्या संबंधीचे रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले प्रतिज्ञापत्र निवीदेसोबत जोडलेले असावे.

३) इमारतीचा मंजूर ले आऊट तसेच महागनर पालिकेने मंजूर केलेला बांधकाम आराखडा व जागा असलेला व बांधकाम पूर्तता दाखला, भोगवटा प्रमाणपत्र, अग्नीसुरक्षा प्रमाणपत्र, प्रॉपर्टी कार्ड, चालू महिन्यातील विद्यामान तारखेपर्यंत कायद्याने देय असलेले सर्व सरकारी व महापालिकेला कर भरले असल्या संबंधीच्या पावत्या, इमारतीमध्ये केलेल्या विद्युतीकरणाचा आराखडा व सुरक्षा प्रमाणपत्र, इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडीटची प्रत, लिफ्ट पाणी, जीना व इतर सामायिक सुविधा वापरणे बाबत तसेच सामायिक मेंटेनन्स बाबतचे सोसायटीचे करारपत्राची प्रत सादर करावी.

४) निविदेमध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यालयीन जागेचा व पार्किंग स्पेसच्या दराबाबतचा दर वेगवेगळा नमूद करावा.

५) यापूर्वी निविदा भरलेल्या व कोणत्याही तृटी नसलेल्या किंवा त्रुटींची पूर्तता केलेल्या निविदाधारकांनी नव्याने निविदा सादर करण्याची गरज नाही.

ठिकाण - मुंबई
दि.- ३० ऑक्टोबर २०२४

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY * MUMBAI *

(श्री. वि. क. थानवी)
प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी